मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड, आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन ४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२–२५४६२३५५
e-mail-cp.thane.mumbra@mahapolice.gov.in



मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस पथकाची आजपावेतो सर्वात मोठी कारवाई

एम.डी अंमली पदार्थ विक्री करणारे आंतरराज्यीय रॅकेट उघड

आरोपी यांचे कब्जातुन एकुण रू.२७,२१,७७,७५०/-

(सत्तावीस करोड एकवीस लाख सत्याहत्तर हजार सातशे पन्नास मात्र) किंमतीचा

१३ किलो ६२९ ग्रॅम वजनाचा मोफेड्रीन (एम.डी) अंमली पदार्थ जप्त

----------OOOOOOOO----------

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर चे हद्दीत अंमली पदार्थाची विक्री व सेवन करणा-यांवर कठोर कारवाई करणेबाबत वरिष्ठ-पो-निरी-श्री-अनिल शिंदे यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे एन-डी-पी-एस पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत केले होते- त्याअनुषंगाने मुंब्रा पोलीस स्टेशनकडील सपोनि/केदार, सपोनि/जाधव यांना प्राप्त माहितीनुसार बिलाल हॉस्पिटलजवळ करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपीत नामे **बासु उमरदीन सय्यद रा. मुंब्रा याचे ताब्यात २३.५ ग्रॅम वजनाचा मोफेड्रीन (एम.डी) पदार्थ मिळुन आल्याने आरोपीताविरोधात गु.र.क. ॥ ४६/२०२६ एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८(क), २२(ब), २९ प्रमाणे** गुन्हा नोंद करण्यात येवुन लागलीच पुढील तपासाची सुत्रे फिरवुन मध्यप्रदेश येथुन एम-डी अंमली पदार्थ विक्री करिता दोन इसम येणार असल्याची खात्रीशीर माहिती अटक आरोपीताने तपासादरम्यान दिल्याने त्याअुनषंगाने करण्यात आलेल्या कारवाईत आरोपीत नामे **रामसिंग अमरसिंग गुज्जर वय-४० वर्षे रा. मध्यप्रदेश व ३) कैलास शंभुलालजी बलई वय-३६ वर्षे, रा. मध्यप्रदेश यांना अटक करण्यात आली असुन आरोपीतांचे ताब्यातुन ०३ किलो ५१५ ग्रॅम वजनाचा रू. ७,३०,५७,७५०/- एकुण किंमतीचा मोफेड्रीन (एम.डी) जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीतांकडे पोलीस कोठडीदरम्यान करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सदरचा अंमली पदार्थ आरोपीत यांनी मध्यप्रदेश राज्य येथुन पाहिजे आरोपीतांनी विक्रीकरिता दिला असलेबाबत सांगितल्याने लागलीच सपोनि/केदार, सपोनि/जाधव, पोउपनि/दळवी व पथकाने जि- रतलाम, राज्य-मध्यप्रदेश येथे जावुन केलेल्या कारवाईमध्ये आरोपीत नामे **मनोहर लाल रंगलाल गुर्जर व राजु उर्फ रियाजमोहम्मद सुलतानमोहम्मद मंसुरी यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचे कब्जातुन एकुण ०९ किलो ९५६ ग्रॅम वजनाचा रू. १९,९१,२०,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन (एम.डी)** हा अंमली जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे-तसेच पाहिजे आरोपीतांचा शोध घेण्यात येत आहे-

मुंब्रा पोलीस स्टेशन येथे वरीलप्रमाणे दाखल गुन्हयात आजपावेतो **<u>०५ आरोपीतांना अटक</u>** करण्यात आली असुन त्यांचे ताब्यातुन **<u>एकुण १३ किलो ६२९.५ ग्रॅम वजनाचा एकुण</u>**

<u>रु.२७,२१,७७,७५०/- (सत्तावीस करोड एकवीस लाख सत्याहत्तर हजार सातशे पन्नास मात्र) रक्कमेचा मेफेड्रॉन (एमडी)</u> हा व्यापारी मात्रा असलेला अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. **मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस पथकाने अंमली पदार्थ विरोधात कारवाईचा धडाका कायम ठेवत ठाणे पोलीस आयुक्तालयातंर्गत पोलीस स्टेशन स्तरावर आजपावेतोची सर्वांत मोठी व उल्लेखनीय कारवाई केलेली आहे.**

नमुद दाखल गुन्हयातील अटक आरोपीत यांचेवर यापुर्वी देखील एन.डी.पी.एस कायदयांतर्गत तसेच भा.द.वि ३०२ प्रमाणे व आर्म्स ॲक्ट प्रमाणे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासादरम्यान प्राप्त आहे. नमुद अटक आरोपी हे मध्यप्रदेश राज्यातुन मोठया प्रमाणात अंमली पदार्थ विक्रीकरिता घेवुन येत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन आरोपी ठाणे परिसरात अंमली पदार्थाची विक्री करीत होते.

मा. पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे यांचे नेतृत्वाखाली मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस पथकाने जानेवारी-२०२४ ते आजपावेतो ९५४ सेवन कारवाई व ५८ ताबा कारवाई करण्यात आलेल्या आहेत तसेच ताबा कारवाईदरम्यान एकुण रु.४८,५०,००,०००/- (एट्रेचाळीस करोड पंचास लाख रुपये) किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आलेले आहे. मुंब्रा पोलीस स्टेशन,ठाणे शहर एन.डी.पी.एस पथकामार्फत अंमली पदार्थांची विक्री व सेवन करणा-या इसमांवर यापुढे देखील अशाचप्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

नमुद कारवाई मा.पोलिस आयुक्त ठाणे शहर श्री. आशुतोष डुंबरे, मा.पोलिस सह आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अप्पर पोलिस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.विनायक देशमुख, मा.पोलिस उप आयुक्त परिमंडळ-०१ श्री.सुभाष बुरसे, सहा.पोलिस आयुक्त सो,कळवा विभाग श्रीमती प्रिया डमाले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली **पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री. शरद कुंभार, पोलीस निरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) श्री.राजु पाचोरकर, पोलीस निरीक्षक(प्रशासन) श्री. नितीन पगार, सपोनि/रोहीत केदार, सपोनि/गणेश जाधव, पोउपनि/राम दळवी, पोहवा/३७३५ राजाराम शेगर, पोशि/२५७१ सागर महांगडे, पोशि/४६१९ निलेश वर्पे, पोशि/८२५८ नवनाथ तेलंगे, पोशि/७६५५ सचिन पाटील, पोशि/८२११ वसीम तडवी, पोशि/५९७४ सागर सपकाळे, पोशि/७६८० प्रवीण पाटील, पोशि/७७२५ नवनाथ थोरवे यांनी केलेली आहे.**